# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

MUHS
वणी दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक -४२२००४

## जाहिरात क्र. ०४/२०२५

## थेट मुलाखत (Walk in Interview)

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे शासकीय / निमशासकीय / विद्यापीठ / सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा करार पध्दतीने तात्पूरत्या स्वरुपात उपलब्ध करुन घेणेकरीता खालीलप्रमाणे थेट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले आहे:

| पदनाम | पदसंख्या | मुलाखतीचा दिनांक |
|---|---|---|
| विशेष कार्य अधिकारी | ०७ | दि. 13/06/२०२५ |

पदनाम, आवश्यक पदसंख्या, कामाचे स्वरुप, विहीत नमुन्यातील अर्ज, दरमहा निश्चित वेतन इ. माहिती विद्यापीठाच्या www.muhs.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

26-5-25

कुलसचिव
मआविवि, नाशिक

दि.०४/०६/२०२५

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

## जाहिरात क्र. ०४/२०२५

## थेट मुलाखत (Walk in Interview)

महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक येथे शासकीय / निमशासकीय / विद्यापीठ / सैनिकी सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी यांच्या सेवा विशेष कार्य अधिकारी पदासाठी करार पध्दतीने मानद स्वरुपात उपलब्ध करुन घेणेकरीता थेट मुलाखतीचे आयोजन करण्यात आले असून त्याबाबतचा सविस्तर तपशिल खालीलप्रमाणे :-

पद : विशेष कार्य अधिकारी

एकूण पदे : ०७

मुलाखतीचा दिनांक : १३/०६/२०२५

वेळ : सकाळी १०.०० वाजता

ठिकाण : महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
वणी दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक – ४२२ ००४

आवश्यक अर्हता : केंद्रशासन / राज्यशासन किंवा स्वायत्त संस्था किंवा अनुदानित संस्था यामधून गट – अ किंवा गट – ब (राजपत्रित व अराजपत्रित) सेवानिवृत्त अधिकारी

अनुभव : संबंधित विभागातील कामकाजाचा किमान तीन वर्षाचा अनुभव

वय : वय ६५ वर्षापेक्षा जास्त नसावे

| अ.क्र. | विभाग | पद संख्या | अर्हता, अनुभव व कामकाजाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | विशेष कार्य अधिकारी (मिळकत व्यवस्थापक) | ०१ | १) नामांकित विद्यापीठाची पदवी<br>२) एम.बी.ए. किंवा हॉटेल मॅनेजमेंट असल्यास प्राधान्य<br>३) केंद्र शासकीय / राज्य शासकीय / निमशासकीय सेवेतून वर्ग 'अ' किंवा 'ब' या संवर्गातून सेवानिवृत्त अधिकारी असून त्यांनी इस्टेट / बांधकामाशी संबंधित प्रकल्प हाताळणे, एच. आर. आणि प्रशासकीय कामकाजाचा किमान तीन वर्षाचा अनुभव धारण करणे आवश्यक<br>४) रियल ईस्टेट नियमांचे ज्ञान असल्यास प्राधान्य<br>५) शैक्षणिक / शासकीय संस्थेत मिळकत व्यवस्थापक म्हणून कामकाज केल्याचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>६) आर्म फोर्सेस सर्विसेस मधून सेवानिवृत्त असल्यास प्राधान्य |
| ०२ | विशेष कार्य अधिकारी (कुलगुरु कार्यालय) | ०१ | विद्यापीठाच्या संविधानिक पदाच्या सर्व प्रशासकीय कामकाजाची देखरेख करणे. तसेच, संविधानिक पदावरील अधिकारी यांचे स्वीय सचिव पदाचे कामकाज सांभाळणे, त्यांचेशी संबंधित बैठकांचे नियोजन तसेच मराठी व इंग्रजी पत्रव्यवहार |

| अ.क्र. | विभाग | पद संख्या | अर्हता, अनुभव व कामकाजाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०३ | विशेष कार्य अधिकारी (स्थापत्य विभाग) | ०१ | बांधकाम संबंधी अंदाजपत्रक मागविणे, शासनाकडून निधी उपलब्ध करुन घेणे इ. करीता प्रस्ताव तयार करुन सादर करणे, अनुषंगिक ई-निविदा प्रक्रिया राबविणे, विद्यापीठांतर्गत इमारत बांधकाम व देखभाल दुरुस्तीची कामे, विद्यापीठाच्या विभागीय केंद्रांचे विस्तारीकरण करण्याच्या दृष्टीने नवीन बांधकामे प्रस्तावित करणे इ. कामकाज |
| ०४ | विशेष कार्य अधिकारी (परीक्षा विभाग) | ०३ | १) वित्त व लेखा विषयक कामकाज : परीक्षा कामकाजाकरीता संलग्नित महाविद्यालयांना अग्रीम देणे, महाविद्यालयांकडून प्राप्त अग्रीम देयकांचे समायोजन करणे, परीक्षा विभागाअंतर्गत विविध परीक्षक यांचे मानधन, प्रवास भत्ता देयके, भरारी पथकांची देयके इ. कामकाज<br>२) विधी विषयक कामकाज : विद्यापीठ कायदा व परीक्षा विभागाचे निदेश, अध्यादेश इ. अन्वये परीक्षेच्या वेळी परीक्षक व विद्यार्थी यांचेकडून होणारी प्रकरणे हाताळणे<br>३) प्रशासकीय कामकाज : परीक्षा विभागातील विविध विद्याशाखांचे प्रशासकीय कामकाज |
| ०५ | विशेष कार्य अधिकारी (महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्था) | ०१ | महाराष्ट्र पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षण व संशोधन संस्थेतील शिक्षकांचे वेतन, वरीष्ठ निवासी / वैद्यकीय अधिकारी यांचे मानधन, जीएसटी, पी.टी., डीसीपीएस्/एनपीएस, वार्षिक लेखे तयार करणे, संगणीकृत लेखे तयार करणे, शासन व विद्यापीठ अंदाजपत्रक तयार करणे, अंतर्गत लेखापरीक्षण, आर्थिक वित्तीय बार्बीविषयी कामकाज पार पाडणेकरीता मार्गदर्शन इ. अनुषंगिक कामकाज |

अटी व शर्ती:

१. सदर नियुक्तीकरीता शासकीय/निमशासकीय सेवानिवृत्त अधिकाऱ्यांच्या सेवा (गट-अ व गट-ब) करार पध्दतीने विवक्षित कामासाठी घेणेबाबत शासनाने निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार वेतननिश्चिती करण्यात येईल.

२. सदर नियुक्तीकरीता निश्चित वेतनाव्यतिरीक्त इतर कोणतेही आर्थिक लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

३. सदर नियुक्ती विद्यापीठ निधीतून तात्पूरत्या स्वरुपात असून नियमित स्वरुपाची नसल्याने नियुक्ती देण्यात आलेल्या उमेद्‌वाराचे विद्यापीठ नियमित सेवेत समावेशन होणार नाही व याअनुषंगिक नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ, रजा रोखिकरण इ. अनुज्ञेय असणार नाही, त्यावर हक्क सांगता येणार नाही.

४. नियुक्तीच्या कालावधीत करार पध्दतीने विवक्षित काम पूर्ण करण्याची जबाबदारी संबंधित व्यक्तीची राहील. याबाबत नियुक्ती देण्यात येणाऱ्या अधिकाऱ्याने बंधपत्र/हमीपत्र देणे बंधनकारक असेल. तसेच, सदर बंधपत्रात जाहिरातीत नमूद व विद्यापीठाने निश्चित केलेल्या अतिरीक्त अटी व शर्ती मान्य असल्याबाबत तसेच करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीकडून नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा इतर कोणत्याही हक्काची मागणी करण्यात येणार नाही असा उल्लेख करणे आवश्यक राहील.

५. सदर बंधपत्र/हमीपत्र प्राप्त झाल्यानंतरच संबंधित सेवानिवृत्त अधिकाऱ्यास तात्पूरती नियुक्ती आदेश देण्यात येईल.

६. सदर कामासाठी करार पध्दतीने देण्यात येणारी नियुक्ती एका वेळी जास्तीत जास्त एका वर्षासाठी देण्यात येईल. नियुक्तीचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर त्यांचे कामकाजाचा आढावा घेवून कामाचे मूल्यमापन केले जाईल. नियुक्तीची आवश्यकता व संबंधितांची सेवा समाधानकारक असल्यास वाढीव कालावधीकरीता दरवर्षी नियुक्तीचे नुतनीकरण करण्यात येईल. मात्र, नियुक्तीचा एकूण कालावधी तीन वर्षापेक्षा अधिक असणार नाही.

७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस वय वर्ष ६५ नंतर नियुक्ती देण्यात येणार नाही.

८. करार पध्दतीने नियुक्त करावयाची व्यक्ती शारिरीक, मानसिक वा आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावी. तसेच, प्रस्तावित सेवेसाठी त्याच्याकडे आवश्यक क्षमता असावी.

९. करार पध्दतीने नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिकारी यांच्याविरुध्द कोणतीही विभागीय चौकशीची कारवाई चालू किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.

१०. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीस आवश्यक प्रसंगी दौरा करावा लागल्यास त्यांना त्यांच्या निवृत्तीवेळच्या वेतनमानास अनुसरुन प्रवासभत्ता व दैनिकभत्ता अनुज्ञेय राहील.

११. करार पध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधितास शासनाच्या / विद्यापीठाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाचे / सामावून घेण्याचे वा नियमित सेवेचे इतर कोणतेही लाभ मिळण्याचा अधिकार / हक्क नसेल.

१२. नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा उमेद्वाराच्या करार पध्दतीवरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

१३. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेली व्यक्ती, सोपविलेली सेवा पार पाडण्याच्या कामात व्यत्यय निर्माण होईल, अशा कोणत्याही व्यवसायिक कामात गुंतलेली नसावी.

१४. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तीने गुंतलेले हितसंबंध (Conflict of interest) जाहिर करणे आवश्यक राहील.

१५. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे / माहिती व आधारसामुग्रीबाबत गोपनीयता पाळणे आवश्यक राहील.

१६. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांच्यावर सोपविलेले कामकाज निश्चित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे आवश्यक राहील.

१७. करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान केले जाणार नाही.

१८. सदर पदाकरीता इच्छुक उमेद्वाराने दि. १३/०६/२०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता विहीत अर्ज व खालील मूळ कागदपत्र व त्यांच्या साक्षांकीत केलेल्या प्रतींसह महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, वणी दिंडोरी रोड, म्हसरुळ, नाशिक येथे मुलाखतीस उपस्थित रहावे.

अ) जन्मतारखेचा पुरावा

ब) शैक्षणिक अर्हतेचे प्रमाणपत्र

क) शासकीय/निमशासकीय/स्वायत्त संस्थेच्या सेवेतून सेवानिवृत्तीचे दस्तऐवज

ड) माजी सैनिक असल्यास डिस्चार्ज बुक

इ) निवृत्ती वेतनासंबंधी दस्तऐवज, शेवटची वेतन पावती

ई) संगणक साक्षरता प्रमाणपत्र (असल्यास)

फ) अनुभव प्रमाणपत्र

१९. उमेद्वारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

२०. मुलाखतीपूर्वी मूळ कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. पात्र झालेल्या उमेद्वारांनाच मुलाखतीकरीता पाचारण करण्यात येईल.

२१. विहित दिनांक व वेळेत उपस्थित न झालेल्या उमेद्वारांचा विचार करण्यात येणार नाही. तसेच टपालाव्दारे प्राप्त झालेल्या अर्जाबाबत विद्यापीठामार्फत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

२२. जाहिरातीत नमूद केलेले पद भरणे किंवा न भरणे याचा हक्क विद्यापीठाने राखून ठेवलेला आहे.

२३. सदर भरती प्रक्रियेअंतर्गत पदसंख्येत बदल करणे, मुलाखत स्थगित अथवा रद्द करणे इ. अन्य कोणत्याही तांत्रिक अडचणी याबाबत निर्णय घेण्याचा सर्व अधिकार विद्यापीठ स्वतःकडे राखून ठेवीत आहे. सदर भरतीप्रक्रियेबाबत विद्यापीठाचा निर्णय अंतिम राहील व तो सर्व उमेद्वारांकरीता बंधनकारक राहील.

Sd/-

ठिकाण : नाशिक — कुलसचिव

दिनांक : ०४/०६/२०२५ — मआविवि, नाशिक

# महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक

जाहिरात क्र. ०४/२०२५

प्रति,
मा. कुलसचिव
महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ
दिंडोरी रोड, म्हसरुळ,
नाशिक - ४२२ ००४

Paste recent Passport Size photo duly self attested

विषय : ______________________________ पदासाठी अर्ज

महोदय,

मी उपरोक्त पदासाठी खालील तपशिलासह अर्ज सादर करीत आहे.

१) नाव : ______________________________
आडनाव  नाव  वडिलांचे / पतीचे नाव

२) पत्रव्यवहाराचा पत्ता : ______________________________

______________________________

______________________________ पिन कोड ______________

३) कायमचा पत्ता : ______________________________

______________________________

______________________________ पिन कोड ______________

४) फोन नं : एसटीडी कोड ____________ (घरचा नं.) ______________

ई-मेल ______________ भ्रमणध्वनी क्र. ______________

५) जन्मतारिख : ______________

(अक्षरी) ______________________________

६) राष्ट्रीयत्व : ______________  ७) प्रवर्ग : राखीव /खुला

राखील असल्यास संवर्ग :- अजा/अज/विजाभज/विमाव/इमाव/

८) संगणकीय ज्ञान : **(MS-CIT, etc.)** : होय / नाही

९) शैक्षणिक/व्यवसायिक/तांत्रिक शिक्षण :

| अ.क्र. | परीक्षा उत्तीर्ण | मंडळ / विद्यापीठ | उत्तीर्ण वर्ष | विषय | टक्केवारी | ग्रेड |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

१०) अनुभव :

| संस्थेचे नाव | पद | अनुभवाचा कालावधी | | |
|---|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत | एकूण |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

घोषणापत्र :

मी, जाहिर करतो/करते की, या अर्जामध्ये सादर केलेली माहिती व त्यासोबतची कागदपत्रे सत्य, पूर्ण व बरोबर आहेत. उपरोक्त माहितीपैकी कोणतीही माहिती चूक किंवा अपूर्ण आढळून आल्यास माझी नियुक्ती रद्द होऊ शकते याची मला जाणीव आहे. तसेच मला कोणतीही पूर्व सूचना न देता माझा अर्ज रद्द केला जाऊ शकतो. जाहिरातीमध्ये दिलेली संपूर्ण माहिती मी काळजीपूर्वक वाचली आहे.

ठिकाण :

दिनांक : (उमेव्दाराचे नाव व स्वाक्षरी)